# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल


**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१८/ 934 दि. 24.04.2018

प्रति,
प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

विषयः **Mahaonline portal वर महाविद्यालयाचे नाव, अभ्यासक्रम, फी, प्रवेश क्षमता इत्यादी माहिती तपासून अद्यावत करण्याबाबत...**

संदर्भः मा. संचालनालयाचे दि.२४.०४.२०१८ च्या ई-मेल संदेशानुसार

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधीन ई-मेल नुसार कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये जिल्हानिहाय महाविद्यालयाची यादी एका विहित नमून्यात दर्शविली आहे. सदर तक्ते तपासून आपल्या महाविद्यालयाची माहिती जसे, **महाविद्यालयाचे नांव, पत्ता, अभ्यासक्रम, फी, प्रवेश क्षमता इत्यादी रकानानिहाय माहिती तपासून पाहणे.**

जर सदर रकान्यांमधील माहितीमध्ये काही दुरुस्ती असल्यास ती **लाल फॉन्टमध्ये** दुरुस्त करुन तसेच रिकाम्या चौकटीत राहून गेलेली माहितीही **लाल फॉन्टमध्ये** भरावी. **तसेच ज्या महाविद्यालयांची माहिती दिसून येत नसेल त्यांनी याच नमून्यात स्वतंत्र माहिती आपले पत्रासह पाठविण्यात यावी.** सर्व रकाने अनिवार्य असून ही माहिती परिपूर्ण करुन शासनास तात्काळ पाठविण्याची असल्याने **दि.२७.०४.२०१८ दुपारी १२.०० वाजेपर्यंत या कार्यालयास ई-मेलव्दारेच** पाठविण्यात यावी.

**सदर माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यात कोणताही बदल न करता पूर्णतः English फॉन्ट मध्येच (इतर कोणताही मराठी फॉन्ट वापरु नये) भरावी. (माहिती Excel Sheet मध्येच पाठविण्यात यावी, Scan करुन पाठवू नये)**

**सदर माहिती ही महाराष्ट्र शासनाने राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलतींकरीता सुरु केलेल्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. यंदा शासनास सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती / सवलती ऑनलाईनच करावयाच्या असल्याने सदर माहिती आवश्यक त्या दुरुस्त्यांसह उपलब्ध न झाल्यास माहिती बरोबर असल्याचे समजून आहे तशी माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात येईल व नंतर याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही. पर्यायाने आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी पोर्टलवर अर्ज करु शकले नाहीत व शिष्यवृत्तीपासून / सवलतींपासून वंचित राहीले. तर याबाबत कोणत्याही विद्यार्थ्याची तक्रार अथवा न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याचे सर्वस्वी उत्तरदायीत्व आपले राहील याची नोंद घ्यावी.**

RBhosle
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रतः

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई
३. मा. कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई